
http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

यशस्वी २० वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

# महामानव
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन!!

भारताचे ज्ञानदीप
समतेचे शिल्पकार
मानवतेचे महामानव
न्यायाच्या सूर्याप्रमाणे तेजस्वी
संविधानाच्या गर्भातून जन्मलेला
स्वातंत्र्याचा शिलेदार
दबलेल्यांचा दीपस्तंभ
शोषितांचा तारणहार
विचारांचा महासागर आणि
संघर्षाचे पर्वतराज!!!





# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास


➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास


या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# "लाडकी लेक, बापाचे अश्रू आणि सासरची वाट

## लगीनसराईतील हृदयाला भिडणारी कथा





– आली लगीन सराई मांडव सजले दारी
लक्ष्मीच्या पावलांनी नवरी आली बाई

घरभर लगबग सुरू. आग ऐ, गौरीची आई! पाहुणं यायला आलं—आवरा आवरा लवकर! पोरगी नटली का बघ, स्वयंपाक कुठवर आलाय, सतरंज्या–गाद्या, गरम पाणी, साबण, पाय धुवायला पाट सगळं जमलं का, बघ जरा! "हो हो बाई थोडं दम धरा. पोरगी दाखवायची आहे, विकायची नाही! माहितीला नटवून थटवून बस करा. पसंत पडली तर बरं; नाहीतर दुसरा नवरदेव बघू."

पण तिकडच्यांच्या चेहऱ्यांवर दिमाख! ना मुलगा फार शिकलेला, ना सरकारी नोकरी, ना वावरं तरीही पोरगी डावलायच्या थाटात आले. चार म्हातारे, दोन पोरी, आणि वरून भारी ताठरपणा—जणू ग्रामपंचायतीची सभा भरवायला आल्यागत!

मुलगी त्यांच्या नजरेतून दचकल्यासारखी पण आई–बापाच्या मनात मात्र वेगळंच वादळ.

पसंती झाली, आणि हळूहळू मागण्या वाढतच गेल्या. "भांडीकुंडी, सोनं, नाणं जरा बरं घाला बाई!"—मुलाची आई म्हणाली. बापाचं काळीज धस्स झालं.
गरीबी, कष्ट, मन मारून साठवलेलं थोडं–फार तेच आज सर्व द्यायचं!
मुलीच्या आनंदासाठी बापाचा संसार नेहमीच गहाण असतो.

खरंच आपण बापाला कठोर म्हणतो, पण त्या कठोरपणामागचं मऊ मन मात्र दिसत नाही.
लेक मोठी होत जाते, लग्न येतं आणि बाप आयुष्यभर 'एक दिवसासाठी' जमा करत राहतो.



विशेष
सौ. सारिका अरुण बेद्रे
लेखिका
चिंचगव्हान – मो. ९९६०३५७९१८

लगीनाचा दिवस उजाडतो.
नवरी सजलेली—स्वर्गीय रूप!
बाप कोपऱ्यातून चोरट्याने तिला बघत राहतो.
एका डोळ्यात आनंद तर दुसऱ्या डोळ्यात वेगळ्या होण्याचं दु:ख.....हळदी–मेहेंदी, लग्न, सनई–चौघडा, रुखवत, पाहुणचार—सगळं थाटात पार पडल्यानंतर, ती क्षण येतो...

लेक घराबाहेर निघते.
बाप तिचा हात हातात घेतो आणि जावयाच्या हाती सोपवताना म्हणतो....

"आजवर होती आमची, आता तुमची. सांभाळा माझ्या लेकीला" आणि स्वत:च मात्र मागे वळून कोपऱ्यात जाऊन ढसाढसा रडतो.

खूप कठीण प्रसंग हा—बापासाठी, आईसाठी, आणि लेकीसाठीही.
जन्मदात्यांच्या छायेत वाढलेली सोन्यासारखी मुलगी आता परकी होत असते.
हे देवा,
त्या नवरीला नव्या संसारात सुख दे,
आणि त्या बापाला, आईला—
आपली लेक सुखाने राहील ही खात्री दे.
जाऊ दे तिचं आयुष्य फुलासारखं
अन् संसार मंगलमय होऊ दे.

# डॉ. रमेश प्रभू यांचे नाव विलेपार्ले मेट्रो स्टेशनला देण्यासाठी निश्चित प्रयत्न करेन : मंत्री अँड. आशिष शेलार

मुंबई : प्रतिनिधी

शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य, राजकीय क्षेत्रात स्वत:ला झोकून समरसतेची वृत्ती जोपासणारे माजी आमदार–माजी महापौर डॉ. रमेश प्रभू यांनी शिवसेनेसाठी आपले जीवन समर्पित केले आणि विलेपार्लेला समृध्द करण्याचे मोलाचे काम त्यांनी केले.

१९८७च्या विलेपार्लेच्या पोटनिवडणुकीत शिवसेनाप्रमुखं बाळासाहेब ठाकरे यांनी खारदांड्याच्या शंकर मंदिरात झालेल्या प्रचारसभेत हिंदुत्वावर मते मागितली, त्यामुळे १९९५ साली निकाल देत या दोघांचा सहा वर्षे निवडणूक लढवण्याचा आणि मतदान करण्याचा हक्क सर्वोच्च न्यायालयाने काढून घेतला. त्यानंतर डॉ. प्रभू यांचे नाव हिंदुत्वाशी जोडले गेले आणि देशात ही निवडणूक चर्चेत आली. मात्र नंतर त्यांची शिवसेनेने अवहेलना केली अशी खंत राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री अँड.आशिष शेलार यांनी काल रात्री पार्ल्यात व्यक्त केली.

तर डॉ.प्रभू यांची कन्या लीना प्रभू यांच्या सूचनेवरून आजच्या पिढीला त्यांचे कार्य समजावे म्हणून "प्रभू महिमा" हे पुस्तक राज्यातील प्रत्येक लायब्ररीत ठेवण्यासाठी आणि त्यांचे नाव विलेपार्ले येथील मेट्रो स्टेशनला देण्याचा पार्लेकरांच्या वतीने आग्रह केला. मी निश्चित प्रयत्न करेन असे आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले. आपला ठसा उमटवण्या डॉ. रमेश प्रभू यांच्या जीवनाची झलक दाखविणारे नाट्यरूप सादरीकरण होणारे ते पहिलेच, माजी महापौर असल्याचे गौरवोद्‌गार त्यांनी काढले.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, जुहू—विलेपार्ले (मुंबई) चे संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. रमेश प्रभू आणि त्यांची पत्नी, प्रख्यात वैद्यकीय चिकित्सक स्व. डॉ. पुष्पा प्रभू यांच्या जीवनप्रवासावर आधारित "प्रभू महिमा" या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा काल रात्री विलेपार्लेच्या दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात आयोजित केला होता. त्यावेळी मंत्री शेलार मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. त्याआधी डॉ. रमेश प्रभू आणि डॉ. पुष्पा प्रभू यांच्या कार्याचा आणि प्रेरणादायी जीवनाची झलक दाखविणारे, लीना प्रभू संकल्पित नाट्यरूप सादरीकरण देखील यावेळी सादर केले होते.




यावेळी विशेष अतिथी म्हणून विलेपार्ल्याचे आमदार अँड.पराग अळवणी तसेच प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार–माजी मंत्री गजानन कीर्तिकर, माजी महापौर अँड.निर्मला सामंत प्रभावळकर, प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे विश्वस्त राजू रावळ, डॉ.प्रभू यांचे पूत्र अरविंद प्रभू, कन्या लीना प्रभू आणि सुमारे साडेतीन तास मोठ्या संख्येने पार्लेकर उपस्थित होते.

आमदार अँड. पराग अळवणी म्हणाले की, डॉक्टर यांचे जीवनपट आणि कार्य म्हणजे आमच्या साठी एक सिलॅबस आहे. या पुस्तकाने त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्व नवीन पिढीला समजेल. शिवसेना भाजप युतीसाठी डॉ.रमेश प्रभू यांनी शिवसेनाप्रमुख आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांची पार्ल्यात रमेश मेहता यांच्या घरी शिवसेनाप्रमुख घेवून जात त्यांची भेट घडवून आणली हा किस्सा त्यांनी सांगितला. १९८७ साली हिंदुत्वावर ते निवडणूक लढले. त्यांची निवडणूक न्यायालयाने रद्द केली. मात्र हिंदुत्व ही एक जीवनशैली असे कोर्टाने सांगितले. हिंदुत्व आज १००० वर्षाची फिलॉसॉफी झाली आहे, आणि या लढ्यात डॉ. रमेश प्रभू यशस्वी झाले असे त्यांनी ठामपणे सांगितले.

गजानन कीर्तिकर यांनी डॉ. रमेश प्रभू यांच्या अनेक आठवणी जागवल्या. त्यांच्या आठवणी पुस्तक रूपाने चिरकाल टिकल्या पाहिजेत, असे आवाहन करत त्यांचा आणि पत्नीचा जीवनपट पुस्तक रूपात उलगडल्याबद्दल त्यांनी प्रभू कुटुंबाचे कौतुक केले.

अँड.निर्मला सामंत – प्रभावळकर म्हणाल्या की, डॉक्टर हे राजकारणातील वेगळे राजकारणी होते. त्यांचा क्रीडा, पर्यावरण, सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे कार्य आणि त्यांचा न्यायालयीन खटला वकील म्हणून जवळून बघितला. त्यांच्या जीवनप्रवासात अनेक अडचणी आल्या त्यावर मात करून त्यांनी आपला ठसा उमटवला असे गौरवोद्‌गार आपण काढले. राजू रावळ यांनी बाळासाहेब ठाकरे आणि बाळासाहेब देवरस यांची डॉ.प्रभू यांनी घडवलेल्या भेटीचा आपण साक्षीदार होतो. १९८७ च्या पोटनिवडणुकीत प्रचाराला आपण अहमदाबाद वरून शंभू महाराज यांना आणले. १९८७ च्या पोटनिवडणुकीत आरएसएस आणि भाजप आणि गुजराथी बांधवांनी डॉ. प्रभू यांना मोलाचे सहकार्य केले. तर हिंदुत्व एकसंघ राहावे ही त्यांची मनापासून इच्छा होती हा किस्सा त्यांनी सांगितला. आपल्या प्रास्ताविकात लीना प्रभू म्हणाल्या की, आई आणि बाबा यांच्या कार्याचा आणि प्रेरणादायी जीवनाची झलक दाखविणारे नाट्यरूप सादरीकरणाची संकल्पना माझ्या मनात घर करून बसलेली. या पुस्तकातून अनेक मान्यवरांनी डॉ. प्रभूंचा जीवनपट उलगडला आहे. त्यांचे कार्य आजच्या पिढीला समजावे म्हणून या पुस्तकाची मराठी आणि इंग्रजी भाषेत मी आणि भाऊ अरविंदने निर्मिती केली. त्यांचे कार्य दिपस्तंभा सारखे होते. त्यामुळे त्यांच्या नावाने विलेपार्लेच्या मेट्रो स्टेशनला मंत्री अँड. आशिष शेलार आणि आमदार अँड. पराग अळवणी यांनी सहकार्य करावे असा त्यांनी आग्रह केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते महेश तपासे यांनी हिंदुत्वासाठी राजकीय हुतात्म्या स्वीकारलेले स्व. डॉ. रमेश प्रभू यांच्या प्रभू महिमा पुस्तकाचे प्रकाशन होत आहे याचा खूप आनंद व्यक्त केला आणि त्यांची आत्ये बहीण, लीना र प्रभू यांच्या मागण्या, स्व. डॉ. रमेश प्रभूंच्या नावाचं स्थान, मेट्रो स्टेशन/ हॉस्पिटल/ शाळा, कॉलेज प्रशासनाला द्यायला पाहिजे, आणि हे पुस्तक राष्ट्राच्या प्रत्येक संग्रहालय मध्ये पोस्ट करायला पाहिजे, यांना पाठिंबा दिला.

# जेष्ठ लोककलावंत शाहीर तुकाराम ठोंबरे महाराष्ट्र शासनाच्या लोककवी वामनदादा कर्डक राज्य सांस्कृतिक पुरस्काराने सन्मानित



बीड : प्रतिनिधी

जिल्ह्यातील केज तालुक्यातील तांबवा या गावातील तांबेश्वर कला पथकाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रभर आपल्या सांस्कृतिक कार्यक्रम पथनाट्याद्वारे प्रबोधन आणि जनजागृती करणारे जेष्ठ शाहीर तुकाराम गीना ठोंबरे यांच्या सतत चाळीस पंचेचाळीस वर्षांच्या प्रदीर्घ सेवेबद्दल महाराष्ट्र शासनाने योग्य ती दखल घेऊन त्यांच्या सांस्कृतिक कार्याचा सन्मान केला. याचा बीड जिल्ह्यातील तमाम लोककलावंत तथा नाट्य नृत्य संगीत सांप्रदायिक कलावंत शाहीर लेखक लोककला अभ्यासक यांना खुप आनंद झाला.

नुकताच दि. ३ डिसेंबर २०२५ बुधवारी रोजी महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिषजी शेलार साहेब यांच्या हस्ते मुंबई येथील रवींद्र नाट्यगृहात महाराष्ट्र शासनाचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्या प्रसंगी मुंबईचे पालकमंत्री तथा सांस्कृतीक संचालनालयातील अधिकारी आणि महाराष्ट्र भरातील अनेक कलाकार उपस्थित होते.

आपल्या कलेच्या माध्यमातून शाहीर ठोंबरे आणि सहकारी जनसेवा आणि प्रबोधनासाठी आपली सेवा बजावत आहे. विविध कार्यक्रम दारुबंदी, हुंडाबंदी, बेटी बचाव बेटी पढावं, वृक्षारोपण, साक्षरता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन अभियान, करोना काळात विविध कार्यक्रम मतदार




जागृती अभियान शासनाच्या विविध योजना चा प्रसार आणि प्रचारासाठी तांबेश्वर कला पधक शाहीर ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली सतत कार्यरत होते आणि आजही आहे. शाहीर ठोंबरे (अण्णा) शासनानाच्या विविध शासकीय कार्यक्रमाद्वारे कलावंतांच्या आर्थिक अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील असतात. तांबेश्वर शाहिरी कलापथक ताबवा तालुका केज जिल्हा बीड ही संस्था सन 1981 ला रजिस्टर असून या संस्थेने गेले 45 वर्षापासून सांस्कृतिक क्षेत्रात शाहिरी कला जोपासली असून शाहिरी प्रशिक्षण मेळावे, स्पर्धा अनेक विद्यार्थ्यांना शाहिरीचे शिक्षण दिले आहे तसेच शासनाच्या विविध विकास योजनेवर प्रबोधनाचे कार्य केलेले असून महाराष्ट्र गोवा गुजरात भोपाळ आधी राज्यात गीत व नाट्य प्रभाग भारत सरकारच्या वतीने शासकीय कार्यक्रम केलेले आहे अनेक फेस्टिवल स्पर्धा विविध कला महोत्सव असे अनेक क्षेत्रात गेल्या 45 वर्षापासून ही संस्था सांस्कृतिक कार्यक्रम करत आहे आजतागायत संस्थेचे कार्य सुरू आहे शाहीर तुकाराम ठोंबरे अध्यक्ष तांबेश्वर शाहिरी कलापथक तांबवा तालुका केज जिल्हा बीड यांचाआज खऱ्या अर्थाने शासनाने योग्य वयात पुरस्कार देऊन त्यांचा सत्कार करून सन्मानित केलं... निश्चितच आम्हाला सर्व बीड जिल्ह्यातील कलावंतांना जेष्ठ शाहीर ठोंबरेआण्णांचा अभिमान वाटतो..

.हा पुरस्कार बीड जिल्ह्यातील सर्व लोककलावंतांना प्रोत्साहन आणि ऊर्जा देणारा आहे जेष्ठ कलावंतास योग्य तो सन्मान देऊन पुरस्काराने गौरवण्यात आले त्या बद्दल शासनाच्या सांस्कृतिक खात्याचे आभार मानतो असे प्रतिपादन लोककला अभ्यासक तथा लोककला अनुदान समीती माजी सदस्य शाहीर विलास सोनवणे यांनी केले तसेच जेष्ठ शाहीर तुकाराम ठोंबरे आण्णा यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल बीड जिल्ह्यातील सर्व कलाकारांसह ह.भ.प.ऊत्तमनाना मोटे शाहिर विलास सोनवणे, शाहीर कैलास काटे, भारुडकार प्रभाकर कुटे, नितीन प्रधान, पांडुरंग राख, शैलाताई मुसळे, जतिन वाघमारे, संतोष कसबे, ह.भ.प.काशीद महाराज, नागनाथ महाराज मुरकुटे येवले महाराज प्रा गोरख पवळसर, वेदांत संगीत महाविद्यालयाचे प्राचार्य केदार सर, प्रा. गयाताई तुरुकमारे, शाहीर कैलास टोनपे, अंबादास दसपुते गोंधळी, बंडु पवार सर्व जेष्ठ साहित्यिक वृद्ध कलावंतातर्फे खुप शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

# चिकलठाणा पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध्य धंद्यांना एनओसी ?

## ● अवैध्य धंद्यांमुळे देशोधडीला लागलेल्या जुगाऱ्यांचे नातेवाईक व सुज्ञ नागरिकांचा संतप्त सवाल

**पैठण : सर्जेराव खडसन**

चिकलठाणा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील छत्रपती संभाजीनगर ते पैठण मुख्य रोडवरील आलांना कंपनी समोर, गेवराई तांडा व गाडीवाट येथे काही दिवसा पासून ऑनलाईन चक्री जुगाराने धुमाकूळ तर घातलेला आहे. त्यात हे कमी होते की काय म्हणून या ठाण्याच्या हद्दीत ईतर दोन ठिकाणी राजरोसपणे पत्त्याचा क्लब सुद्धा चालू असल्याने या पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध्य धंदे बंद होण्या ऐवजी त्यांच्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होऊन हजारो कुटुंब रस्त्यावर येऊन उध्वस्त होत असल्याचे ढळढळ दिसत आहे. त्यामुळे पोलिसांनी या वाढत्या अवैध्य धंद्यांना छुप्या पद्धतीने "एन ओ सी " दिली आहे की काय ?असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे आता जिल्हा पोलिस अधीक्षकांनीच याची प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन या जुगाराच्या माध्यमातून देशोधडीला लागणारे हजारो कुटुंब वाचवावे अशी सुज्ञ नागरिकांतून मागणी होत आहे.

कमी गुंतवणुकीत डबल नफा मिळतोय या लालसेने चिकलठाणा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लहानापासून ते मोठ्यापर्यंत अनेकांना ऑनलाईन चक्री जुगाराने वेड लावले आहे.

त्यामुळं याच गोष्टीचा फायदा घेत या परिसरातील काही अवैध्य धंद्यावल्यांनी आपला मोर्चा छत्रपती संभाजीनगर ते पैठण मुख्य रस्त्यावर असलेल्या गेवराई तांडा, अलाना कंपनी तसेच गाडीवाट येथे वळवला आहे. त्यांनी येथे काही खाजगी गाळे भाड्याने घेऊन ईतर काही व्यवसायात एका वर्षांत जितका पैसा कमावता येत नाही, तेवढा पैसा या लाल पडद्याच्या आड असलेल्या ऑनलाईन चक्री जुगारात मिळवून मालामाल होण्याचे "मुंगेरी लाल के हसीन स्वप्न "दाखवून या परिसरातील कंपनीतील कामगार, हमाल तसेच शेतमजूर व विद्यार्थ्यांना राजरोसपणे लुटण्याचे काम सुरू आहे. परंतु अवैध्य धंदे बंद करण्याची खरी जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्यांनीच या अवैध्य धंद्याकडे दुर्लक्ष केल्याने ऑनलाईन चक्री, पत्त्याचा क्लब, दारू अड्ड्यात दिवसेंदिवस वाढ होऊन सर्वसामान्यांना लुबाडण्याचा व्यवसाय यशोशिखरावर जाऊन पोहचला आहे. येथे दारू विक्री, पत्त्याचा क्लब, ऑनलाईन चक्री चालवणारे मालामाल होऊन डबल पैसा कमावण्याच्या नादात अनेकांचे सुखी संसार उध्वस्त होत आहेत. त्यामुळे चिखलठाणा पोलिसांनी त्यांच्या हद्दीत अवैध्य धंद्यांना छुप्या पद्धतीने "एन ओ सी " दिली आहे की काय ?असा संतप्त सवाल या अवैध्य धंद्यामुळे देशोधडीला लागलेल्या जुगाऱ्यांचे कुटुंबीय व सुज्ञ नागरिकांतून उपस्थित तर केला जात आहे.

त्यामुळे जिल्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच याची गांभीर्याने दखल घेऊन या परिसरातील पत्त्याचा क्लब, ऑनलाईन चक्री जुगार अड्डे उध्वस्त करून या जुगारामुळे देशोधडीला लागणारे हजारो कुटुंब वाचवावे अशी नागरिकांतून मागणी होत आहे.

# नराधमाला फाशीच झाली पाहिजे!

## छत्रपती संभाजीनगरात महाराष्ट्र एकवटला; यज्ञा बाळाला न्याय देण्यासाठी सर्वसामान्य जनता उतरली रस्त्यावर!












## सकल सोनार समाज आयोजित आक्रोश मोर्चात बहुसंख्येने सर्व समाजाची उपस्थिती !

**छत्रती संभाजीनगर :** दि. 05/12/2025 शुक्रवार आज छ. संभाजीनगर येथे सकल सोनार समाजातर्फे मालेगाव येथील डोंगराळे गावातील कु. यज्ञा दुसाने या बालिकेवर झालेल्या अत्याचार विरुद्ध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळेस क्रांतीचौक येथे सोनार समाजाला न्याय मिळावा म्हणून सर्व जाती धर्माची जनता रस्त्यावर उतरली. तसेच राजकीय, सामाजिक आणि व्यापारी क्षेत्रातील सर्व समाजातील बांधव उपस्थित होते.

मोर्चासाठी वेगवेगळ्या सुवर्णकार संघटना यांनी पुकारलेल्या बंदला प्रतिसाद देवून शहरातील तसेच खुलताबाद, सिल्लोड, फुलंब्री, पैठण, कन्नड वैजापूर या तालुक्यातील, बीड, परभणी आणि मराठवाड्यातील सर्व जिल्हाभरातून सराफ बांधव यांनी मोर्चामध्ये हजेरी लावली. मा. आमदार श्री प्रदीपजी जैस्वाल साहेब, शिवसेना जिल्हाध्यक्ष श्री राजू भाऊ जंजाळ शहरातील आजी माजी नगर सेवक, वकील संघटना, शिक्षक संघटना, कीर्तनकार संघटना तसेच अनेक संघटनांचे पदाधिकारी यांनी या मोर्चाला उपस्थित राहून पाठिंबा दिला. पीडितेस श्रद्धांजली अर्पण करून मुली आणि महिला यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाला सुरूवात करण्यात आली, "यज्ञाला न्याय मिळालाच पाहिजे", "आरोपीला फाशी द्या", "लाडकी बहीण महत्त्वाची तेवढीच सुरक्षित बहिणसुद्धा महत्त्वाची" असे नारे देत, नराधम्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशा शब्दांत आक्रोश करीत मोर्चा सिटीचौक कीलेअर्क मार्गे मार्गस्थ झाला. डोंगराळे गावात जाऊन तेथे आमरण उपोषण करणाऱ्या साध्वी गायत्री दीदी आणि 5 बालिका यांनी दिल्ली गेट येथे उपस्थितांना संबोधित केले, यानंतर मोर्चाच्या शिष्टमंडळातर्फे विभागीय आयुक्तांना निवेदन देण्यात आले. या मोर्चासाठी सकल सोनार समाज आणि सुवर्णकार संघटना यांचे ज्येष्ठ पदाधिकारी तसेच किशोर दुसाने, मयूर रांजणगावकर, अनिल सोनवणे, आदित्य दहिवाळ, उमेश क्षीरसागर, प्रकाश दाभाडे, विष्णू सोनवणे, गणेश दुसाने, अजय सोनवणे, शुभम अधिकार, भरत कल्याणकर, संतोष अधिकार, राजेंद्र बाविस्कर, राम भामरे, विजय अधिकार, महेश लाखुळकर, कुणाल निकम यांनी मोलाचे सहकार्य केले.



**आम्हाला न्याय पाहिजे!**














## विशेष

# चिंचोली लिंबाजी येथे आज सकाळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या बांधकामाला सुरुवात





### समस्त चिंचोली लिंबाजी गावकरी ग्रामस्थ शिवभक्त तरुण युवा गावकऱ्यांची उपस्थिती

➤ चिंचोली लिंबाजी : सचिन गुरव

कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नियोजित पुतळ्याच्या बांधकामाचा आज नारळ फोडून जेसीबी मशीनच्या सहाय्याने कामाला दिमागदार सुरुवात झाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चिंचोली लिंबाजी पुतळ्याच्या कामाचा आज मार्गशीर्ष महिन्यात मुहूर्त सुरू झाला सदरील कामाच्या आजच्या दिवशी ग्रामपंचायत कार्यालय चिंचोली लिंबाजी समोर सर्व शिवभक्तांची गावकऱ्यांची ग्रामस्थांची शिवस्मारक समितीचे सर्वच सदस्य व छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण गावातील सर्व समाजाचे अठरा पगड जातीतील सर्वच घटक उपस्थित होते त्यांच्या सर्वांच्या हाताने श्रीफळ फोडून जय भवानी जय शिवाजीच्या घोषणेबाजी कामाला सुरुवात झाली त्यावेळेस परिसरातील शिवभक्त व गावातील सर्वच ग्रामस्थ तरुण युवा मंडळ उपस्थित होते.

# प्रतिभावंत आणि अष्टपैलू खेळाडू शौर्य शैलेश जाधवची महाराष्ट्र संघात निर्विवाद निवड



### शिर्डीतील राज्य शालेय क्रिकेट निवड स्पर्धेत बीडचा शौर्य

शिर्डी : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने आयोजित राज्य शालेय क्रिकेट ( U-17 ) मुलें निवड स्पर्धा सन 2024-25 चे शिर्डी येथे यशस्वी आयोजन करण्यात आले. राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यांतील शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला .या स्पर्धेमध्ये राज्यभरातील हजारो प्रतिभावान खेळाडूंच्या दमदार कामगिरीतून 70 ते 80 उत्कृष्ट खेळाडू यांची पुढील निवड चाचणीसाठी निवड करण्यात आली. कठोर निवड प्रक्रियेनंतर महाराष्ट्र राज्य शालेय क्रिकेट संघासाठी केवळ 16 मुलांची अंतिम निवड करण्यात आली.

या 16 राज्यस्तरीय निवडीतील मुलांत बीड जिल्ह्याचा शौर्य शैलेश जाधव याने आपली विजयी मजल मारत राज्य संघात स्थान पटकावले आहे. आपल्या उत्कृष्ट तंत्र, सातत्यपूर्ण सराव आणि प्रभावी खेळाच्या जोरावर शौर्यने राज्य निवड समितीचे लक्ष वेधून घेत सर्वोत्कृष्टांमध्ये स्थान मिळवले.

शौर्यच्या या कामगिरीमुळे बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून त्याचे प्रशिक्षक, पालक, शाळा, तसेच जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी यांच्याकडून शौर्यवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या आधी देखील शौर्याची ऊ-14 महाराष्ट्र राज्य शालेय क्रिकेट संघात निवड झाली होती तसेच गत वर्षी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत तो U-14 महाराष्ट्र संघाकडून खेळला आसून कमी वयात यावेळेस U-17 राज्य संघातून खेळण्याची संधी मिळाल्यामुळे त्याच्या कारकिर्दीसाठी नवे दालन खुले झाले आहे.

बीड जिल्ह्याच्या क्रिकेट आसोसेशनच्या वतीने तसेच बीड जिल्हा क्रिकेट वकील संघ आणि फ्रेंड्स स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने शौर्य शैलेश जाधवचे मन :पूर्वक अभिनंदन आणि पुढील स्पर्धांसाठी हार्दिक शुभेच्छा!




### सार्वजनिक बांधकाम व वन विभागाचे दुर्लक्ष; नागरिक व पर्यावरणप्रेमींचा संताप

# लोणगाव-जीवनापूर रस्त्यावर विजेच्या खांबांसाठी बेसुमार वृक्षतोड

### ➤ रस्त्याच्या अगदी कडेला खांब उभारणी ➤ अपघातांचा धोका वाढला

➤ अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी

तालुक्यातील लोणगाव ते जीवनापूर या प्रमुख रस्त्यावर विजेचे खांब उभारण्याच्या नावाखाली ठेकेदाराकडून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडांची मनमानी तोड होत असून विजेचे खांब थेट रस्त्याच्या साईड पट्ट्यात बसवले जात असल्याने वाहनचालकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे.


दररोज मोठ्या प्रमाणात शेतकरी, दुचाकी व चारचाकी चालक या मार्गावरून प्रवास करत असतात. मात्र खांब रस्त्याच्या कडेला असल्याने वाहन घसरल्यास थेट धडक बसण्याची भीती व्यक्त होत आहे. पावसाळ्यात किंवा रात्रीच्या वेळी अपघात होण्याचा धोका आणखी वाढणार असल्याचे नागरिक सांगत आहेत .वृक्षतोड करताना आवश्यक परवानग्या घेतल्या का? तोडलेल्या झाडांच्या जागी वृक्षलागवड केली जाणार आहे की नाही? याबाबत कुठलीही अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये आणि पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. रस्त्यालगतची झाडे ही केवळ सावलीपुरती महत्त्वाची नसून अपघात नियंत्रणासाठीही आवश्यक असतात. त्यामुळे अशी झाडे तोडून खांब बसवणे म्हणजे अपघातांना आमंत्रणच असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली .या प्रकरणात संबंधित ठेकेदारावर तात्काळ कारवाई करून चुकीच्या ठिकाणी बसवलेले खांब सुरक्षित अंतरावर हलवावेत तसेच तोडलेल्या झाडांच्या बदल्यात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक, शेतकरी आणि पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाकडे केली आहे. प्रशासनाने वेळेत दखल न घेतल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.


**गुत्तेदारावर कारवाई करण्यात येईल**

● "महावितरणचे खांब राज्य रस्त्याच्या साईड पंख्यांमध्ये उभारल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे. महावितरणकडून आमच्याकडे ना-हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही. विजेचे काम करीत असलेल्या गुत्तेदारावर कारवाई करण्यात येईल."
**- विष्णु जाधव,** उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, माजलगाव

**.... तर कारवाई केली जाईल**

● "खांब उभारणीचे काम दोन गुत्तेदारांना देण्यात आले आहे. जर त्यांनी साईड पंख्यात खांब रोवले असतील किंवा अनधिकृत वृक्षतोड केली असेल, तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल."
**- बोबडे,** अभियंता, महावितरण तेलगाव विभाग





# ऊसतोड मजुराचा पाण्यात बुडून मृत्यू; चौथ्या दिवशी प्रेत सापडले

➤ माजलगाव : प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातीलब्रम्हगाव येथील रहिवासी बालासाहेब दासु कांबळे वय ३६ या ऊसतोड मजुराचा २ डिसेंबर २०२५ रोजी सिंदफना नदीत बुडून मृत्यू झाला होता. या घटनेनंतर सलग तीन दिवस त्याचा शोध सुरू होता. अखेर ५ डिसेंबर रोजी सकाळी त्याचे प्रेत पाण्यावर फुगून आल्याने सापडले .बालासाहेब कांबळे हे ऊसतोड कामासाठी कोपीकडे वास्तव्यास होते. त्याच दरम्यान, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे ऊसतोड बंद होती. याच दरम्यान, ते सिंदफना नदी पार करताना पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. मृत्यू झाल्यानंतर एनडीआरएफची टीम आणि स्थानिक प्रशासनाने प्रेत शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र सुरुवातीला प्रयत्नांना यश आले नाही. अखेर चौथ्या दिवशी प्रेत फुगून नदीच्या पाण्यावर दिसले.



ही घटना गाव आणि शहर परिसरात हळहळ व्यक्त करणारी ठरली आहे. ऊसतोड मजुरांच्या सुरक्षिततेचा मुद्दा यानिमित्ताने पुन्हा ऐरणीवर आला आहे. शासन आणि प्रशासनाने अशा मजुरांसाठी योग्य ती मदत करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त लिंबागणेश जिल्हा परिषद शाळेत

# 'एक वही – एक पेन' अभियानातून डॉ. बाबासाहेबांना अनोखी आदरांजली

➤ लिंबागणेश : प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, सामाजिक न्यायाचे प्रणेते आणि महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लिंबागणेश येथील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भावपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, दिवे व मेणबत्त्या प्रज्वलित करत उपस्थित मान्यवरांनी आदरांजली वाहिली.

या प्रसंगी सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, प्रा. लेनाजी गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य रमेश गायकवाड, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी डॉ. बाबासाहेबांच्या कार्यावर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेचे मुख्याध्यापक दिपक घाटे यांनी केले. कार्यक्रमाला सहशिक्षिका श्रीमती गिते, श्रीमती सानप, श्रीमती अयाचित, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, माजी सरपंच शंकर वाणी, सय्यद अख्तर, सर्पमित्र अशोक जाधव, संदीप मुळे, नितीन जाधव, आरुण निर्मळ, पप्पू निर्मळ आदी मान्यवर उपस्थित होते.

**"एक वही – एक पेन" : विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उपक्रम**

महापरिनिर्वाण दिनाच्या औचित्याने विद्यार्थ्यांना वही–पेन आणि शालेय साहित्याचे वाटप करून डॉ. बाबासाहेबांना अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत उत्साह निर्माण झाला असून, गावकऱ्यांनीही या कल्पनेचे स्वागत केले.




**डॉ. गणेश ढवळे यांचे प्रेरणादायी मनोगत**

● डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाला दिलेले सर्वोच्च स्थान अधोरेखित करत डॉ. गणेश ढवळे यांनी "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" या त्यांच्या वैचारिक संदेशातून मिळणाऱ्या प्रेरणेवर भाष्य केले. ते म्हणाले, शिक्षण हेच प्रगतीचे खरे साधन आहे. कठोर परिश्रम, जिद्द आणि ज्ञानाची न थांबणारी ओढ ही बाबासाहेबांच्या जीवनाची दिशा आहे. सामाजिक न्याय, मानवता, समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या लोकशाहीच्या चार स्तंभांवर त्यांनी आधुनिक भारताची भक्कम उभारणी केली. संविधानातील मूल्ये फक्त कायद्यात न राहता प्रत्येकाच्या मनात आणि कृतीत उतरली पाहिजेत, हाच बाबासाहेबांना खरा मानाचा मुजरा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील दोन एनसीसी कॅडेट्सची अग्निवीर सैन्य दलात निवड

किल्ले धारूर : प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी शेप ज्ञानेश्वर देवराव व फुटाणे आदित्य नवनाथ या दोन विद्यार्थ्यांचची इंडियन आर्मी अग्निवीर मध्ये निवड झाल्याने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते शाल व पुष्पहार देव स्वागत व सत्कार करण्यात आला.

राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे अनेक विद्यार्थी यापूर्वी भारतीय सैन्य दलामध्ये भरती झालेले आहेत. उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड एनसीसी कॅडेट्सना विविध भारतीय सैन्य दलातील परीक्षासंबंधी मार्गदर्शन करत असतात. धारूर सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एनसीसी नोकरीच्या दृष्टीने अधिकाधिक उपयुक्त ठरत आहे. सत्काराप्रसंगी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी सदिच्छा दिल्या. यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, डॉ. अनंथा गाडे याबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शैक्षणिक सहली, लग्नसमारंभांसाठी 'लालपरी' सुसाट

पेण : नोव्हेंबर आणि डिसेंबरच्या दरम्यान अनेक शैक्षणिक सहली आणि त्यातच लग्नसमारंभाचा सीजन असल्याने या दोन महिन्यात एसटीच्या प्रासंगिक कराराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात बुकिंग होत असते. दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील रायगड विभागाची एसटी प्रासंगिक कराराच्या माध्यमातून सुसाट धावत असून नोव्हेंबर महिन्यात एसटीच्या रायगड विभागाच्या ९४ बसेस बुक झाल्या. या बुकिंगच्या माध्यमातून एसटीने महिनाभरात ३६५७७ किमीचा प्रवास करून प्रवाशांची तसेच विद्यार्थी आणि समारंभातील कुटुंबीयांची सेवा केली आहे. त्यामुळे खासगी वाहनांपेक्षा एसटीच्या माध्यमातून आपला प्रासंगिक करार करून पारदर्शक आणि सुरक्षित प्रवास यापुढे देखील प्रवाशांनी करावा असे आवाहन रायगड विभाग नियंत्रक डॉ. सुहास चौरे यांनी प्रवाशांना केले आहे. महाराष्ट्राला लाभलेली धार्मिक संस्कृती, गडकिल्ले आणि कोकण किनारपट्टीवर असणारी असंख्य पर्यटन स्थळे यामुळे अनेक शैक्षणिक सहली अशा ठिकाणी प्रामुख्याने जात असतात.

### दुपारी दोन वाजता रुग्णालयात केवळ एक डॉक्टरची उपस्थिती ➤ रुग्णालयातील अनेक विभागाला आढळून आले कुलूप

# चिंचवनचे ग्रामीण रुग्णालय शासनाने बंद केले की काय?

### ➤ वैद्यकीय अधीक्षक यांच्या निष्क्रिय कारभाराचा डोंगर पट्ट्यातील रुग्णांना फटका






➤ वडवणी : प्रतिनिधी

बालाघाट डोंगर रांगेतील गोरगरीब शेतकरी शेतमजुरांसाठी शासनाने निर्माण केलेले ग्रामीण रुग्णालय केवळ शोभेची वस्तू होऊन बसले आहे. या रुग्णालयात शासनाने नियुक्ती केलेले डझनभर अधिकारी आणि अनेक कर्मचारी असताना केवळ पगार उचलण्याचे काम हे अधिकारी, कर्मचारी करतात की काय असा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. भर दिवसा या रुग्णालयाचा मसनवाटा झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कारण दुपारी दोन वाजता देखील या रुग्णालयात केवळ एक वैद्यकीय अधिकारी आणि एक-दोन कर्मचारी दिसून आले. उर्वरित अधिकारी आणि कर्मचारी कुठे गेले होते? त्यांना पगार सुरू नाही का? शासनाने हे रुग्णालय बंद करून टाकले की काय? असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

वडवणी तालुक्यातील चिंचवन या डोंगरपट्ट्यातील अत्यंत दुर्गम भागात असलेल्या गावात मागील अनेक वर्षांपासून शासनाने ग्रामीण रुग्णालय सुरू केलेले आहे. डोंगरपट्ट्यातील गोरगरीब ऊसतोड कामगार आणि शेतकऱ्यांना या रुग्णालयाचा मोठा फायदा होत होता. सध्या ऊस तोडणीचे दिवस असल्यामुळे घरातील कर्ते पुरुष, स्त्रिया परप्रांतात ऊस तोडणी साठी गेलेले आहेत. घरातील वृद्ध नागरिक शालेय विद्यार्थी आणि आजारी रुग्ण यांना हे ग्रामीण रुग्णालय म्हणजे आरोग्याचे दालन समजलं जातं. मात्र हे रुग्णालय आता अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभाराचे केंद्र बनलं आहे. या ठिकाणी रुग्णांना कोणतीही सेवा मिळताना दिसून येत नाही. या रुग्णालयात अधीक्षका पासून ते वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी देखील वेळेवर उपस्थित राहत नाहीत. केवळ दिन जाव पगार आव या परिस्थितीत काम करून शासकीय पगारावर ताव मारण्याचे काम या ठिकाणचे अधिकारी कर्मचारी करतात की काय? असा सवाल आता उपस्थित करावा लागत आहे. या ठिकाणी शुक्रवारी या गावातील प्रतिष्ठित नागरिक बालाजी महिपतराव कोदुळे व नवनाथ विठ्ठलराव गिलबिले यांनी रुग्णालयाला भेट दिली असता त्यांना त्या ठिकाणी अत्यंत विचित्र परिस्थिती पाहायला मिळाली. या रुग्णालयात त्यांना केवळ एकच वैद्यकीय अधिकारी आढळून आला. अधीक्षक व इतर वैद्यकीय अधिकारी हे कार्यालयात दिसून आले नाहीत. तसेच कार्यालयातील विविध विभागातील कर्मचारी देखील दिसून आले नाहीत. रुग्णालयातील ही परिस्थिती पाहिल्यानंतर त्यांनी या रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर उमेश करमाळकर यांना फोन केले. मात्र त्यांनी त्यांचा फोन देखील उचलला नाही. मात्र त्यांनी नेमलेले एका खाजगी व्यक्तीने फोन लावल्यानंतर त्यांनी तत्काळ फोन उचलला. यावरून या ठिकाणी किती सावळा गोंधळ सुरू आहे हे कोदुळे यांच्या निदर्शनास आले. कोदुळे चिंचवन येथील प्रतिष्ठित नागरिक आणि सामाजिक कार्यातील पुढारलेले कार्यकर्ते असल्यामुळे त्यांना हा प्रकार सहन झाला नाही. त्यांनी तत्काळ पत्रकारांना बोलावून याबाबतची माहिती दिली. चिंचवन ग्रामीण रुग्णालयाच्या कारभाराची सखोल चौकशी व्हावी आणि या दवाखान्यात होणाऱ्या अनागोंदी कारभाराची चौकशी व्हावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

**चिंचवन ग्रामीण रुग्णालयातील स्टाफ**

| | | | |
|---|---|---|---|
| वैद्यकीय अधीक्षक | 01 | एक्स-रे टेक्निशियन | 02 |
| वैद्यकीय अधिकारी | 03 +4 ( कंत्राटी) | स्टाफ नर्स. | 07+2( कंत्राटी) |
| कार्यालयीन अधीक्षक | 01 | शिपाई. | 06 |
| कलर्क. | 02 | गार्ड. | 02 |
| लॅब टेक्निशियन. | 01 | वाहनचालक. | 01( कंत्राटी) |
| फार्मासिस्ट. | 01+ 2 ( कंत्राटी) | कॉर्डिनेटर. | 01( कंत्राटी) |

● वरील प्रमाणे या रुग्णालयात एकूण 36 अधिकारी कर्मचारी आहेत अशी माहिती मिळाली आहे.

### रुग्णालयाचा व्हिडिओ आरोग्यमंत्र्याकडे

● चिंचवन ग्रामीण रुग्णालयातील अनागोंदी कारभाराचा व्हिडिओ काढून तो व्हिडिओ महाराष्ट्राच्या आरोग्यमंत्र्याकडे तसेच बीडचे जिल्हाधिकारी, खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांना पाठविण्यात आले आहे. या बाबत सखोल चौकशी करून कडक कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते बालाजी कोदुळे यांनी केली आहे.